




दैनिक अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २८४, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२६ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# सातार्‍यातून स्कॉर्पिओने कोकणात फिरायला गेले, रात्रीच्या अंधारात झाला घात !

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२५, महाबळेश्वर (सातारा) :** महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील मुख्य आंबेनळी घाटात दाभिळ टोक परिसरात रविवारी रात्री उशिरा अत्यंत भीषण अपघात घडला. सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुक्यातील आसगाव येथील आठ तरुणांची 'स्कॉर्पिओ' कार सुमारे १ हजार फूट खोल दरीत कोसळली. या भयानक अपघातात कारमधील सर्वच्या सर्व ८ तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे. वीकेंडला कोकणात पर्यटनाचा आनंद घेऊन परतत असताना या तरुणांवर काळाने घाला घातला.



**चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार दरीत कोसळली**

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, मृत तरुण हे सातारा जिल्ह्यातील आसगाव (ता. कोरेगाव) येथील रहिवासी होते. हे सर्वजण स्कॉर्पिओ कार क्र. MH 11 DN 2340 मधून कोकणात पर्यटनासाठी गेले होते. रविवारी रात्री उशिरा कोकणातून महाबळेश्वर मार्गे सातार्‍याकडे परतत असताना, आंबेनळी घाटात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट १ हजार फूट खोल दरीत कोसळली. दरी अत्यंत खोल असल्याने कारचा पूर्णपणे चेंदामेंदा झाला आहे.

या अपघातातील सर्व ८ मृतांची नावे समोर आली असून, यामध्ये कोरेगाव परिसरातील तरुण आणि जबाबदार व्यक्तींचा समावेश असल्याने आसगाव परिसरावर शोककळा पसरली आहे.

## आंबेनळी घाटात झालेल्या भीषण अपघातात आठ जण ठार

**मृतांची नावे खालीलप्रमाण :** १. महेश पवार २.आदित्य साळुंखे ३. रितेश राजेंद्र लोखंडे ४. सुहास जितेंद्र लोखंडे ५. अंश समीर चव्हाण ६. उत्कर्ष आनंद शिंगटे (वय २१) ७. अनिल अभिमन्यू शिंगटे ८. नितीन किसन नायकोंडे



**बचावकार्यासाठी प्रशासन व विविध ट्रेकर्सची मोठी कसरत**

अपघातग्रस्त स्कॉर्पिओ कार घाटातील अत्यंत दुर्गम आणि खोल भागात असल्याने मृतदेह आणि गाडी बाहेर काढण्यासाठी प्रशासनाला मोठी कसरत करावी लागत आहे. रविवारी रात्री अपघात झाल्याचे समजताच स्थानिक प्रशासन, महाबळेश्वर ट्रेकर्स आणि प्रतापगड सर्च अँड रेस्क्यू टीमने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

रात्रीच्या अंधारात आणि प्रतिकूल परिस्थितीतही मदतकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले होते. सोमवारी सकाळीही शोध आणि बचाव पथकांकडून विशेष तांत्रिक उपकरणांचा वापर करून मृतदेह दरीतून वर काढण्याचे काम सुरू आहे. घटनास्थळी स्थानिक पोलीस, महसूल प्रशासनाचे अधिकारी, तसेच मृतांचे नातेवाईक आणि ग्राम स्थांनी मोठी गर्दी केली आहे. या घटनेमुळे संपूर्ण सातारा जिल्ह्यातून तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोमातेच्या, अवैध वाहतुकीविरोधात राज्य सरकारचा बुलडोझर



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.२५, मीरा भाईंदर :** आगामी बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर राज्यात गोमातेची अवैध वाहतूक, बेकायदेशीर कत्तलखाने आणि जनावरांवर होणाऱ्या अमानुष अत्याचारांविरोधात राज्य सरकारने आता कठोर भूमिका घेतली असून, गोम ातेची तस्करी आणि कत्तल कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट आणि आक्रमक इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार परिवहन विभागाने संपूर्ण राज्यात विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, उपप्रादेशिक अधिकारी, सीमा तपासणी नाके, तसेच वाहतूक यंत्रणेला २५ मे ते २८ मे २०२६ या कालावधीत युद्धपातळीवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नातून राज्याने देशी गाईला 'राज्यमाता'चा सन्मान दिला आहे. हिंदू समाजासाठी गोमाता ही श्रद्धेचा आणि संस्कृतीचा विषय आहे. अशा पवित्र गोमातेची कत्तल करून तिची अवैध वाहतूक करणाऱ्यांना आता कायद्याचा कठोर धडा शिकवला जाईल.

ते पुढे म्हणाले, विशिष्ट सणांच्या काळात गोमातेची तस्करी वाढते, गोवंशाला कोंबून, उपाशी ठेवून, अमानुष पद्धतीने वाहनांमध्ये भरले जाते. हा केवळ कायद्याचा भंग नसून हिंदू समाजाच्या श्रद्धांवर घाला आहे. अशा गोतस्करांविरोधात कठोरात कठोर कारवाई करण्यात येईल.

परिवहन आयुक्त कार्यालयाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, राज्यातील सीम ावर्ती भाग, मुंबईसह प्रमुख शहरे आणि संवेदनशील मार्गांवर विशेष नाकाबंदी व वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. जनावरांची वाहतूक करणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी केली जाणार असून, आवश्यक परवानग्या, प्रमाणपत्रे आणि प्राणी कल्याण नियमांचे पालन झाले आहे का, याची पाहणी केली जाईल.

सरनाईक यांनी स्पष्ट केले की, मोटार वाहन कायदा, प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा आणि केंद्र शासनाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. नियमबाह्य वाहतूक करणारी वाहने थेट जप्त करण्यात येतील.

या मोहिमेत परिवहन विभागासोबत स्थानिक पोलीस, वाहतूक पोलीस, पशुसंवर्धन विभाग आणि विविध गोसेवा व प्राणी कल्याण संस्थांचा समन्वय साधण्यात येणार आहे. अवैध कत्तलखान्यांना होणारा जनावरांचा पुरवठा रोखण्यासाठी विशेष पथकेही नियुक्त करण्यात आली आहेत.

गोमाता संरक्षण हा केवळ कायद्याचा विषय नसून हिंदुत्वाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. मुक्या जनावरांवर अत्याचार करणाऱ्यांविरोधात सरकार झुकणार नाही. राज्य सरकार गोसंरक्षणासाठी कटिबद्ध आहे, असेही प्रताप सरनाईक यांनी ठामपणे सांगितले.

या विशेष मोहिमेअंतर्गत करण्यात आलेल्या कारवाईचा सविस्तर अहवाल शासनाला सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# कंटेनरच्या चाकाखाली चिरडल्याने तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.२५, बोरी (परभणी) :** बोरी बसस्थानक परिसरात भरधाव कंटेनरच्या चाकाखाली सापडून एका तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. या अपघाताम ुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, परभणी शहरातील रहिवासी असलेला एक तरुण मोटारसायकलवरून जिंतूरकडे जात होता. याच दरम्यान बोरी बसस्थानकाजवळ भरधाव वेगात येणाऱ्या कंटेनरने त्याच्या



दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की तरुण कंटेनरच्या चाकाखाली सापडून गंभीर जखमी झाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली, मात्र त्याचा जागीच मृत्यू झाला होता.घटनेची माहिती मिळताच बोरी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. अपघातानंतर काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. संतप्त नागरिकांनी भरधाव वाहनांवर नियंत्रण ठेवण्याची म ागणी केली.या मार्गावर अवजड वाहनांची सतत वर्दळ असते. अनेकदा भरधाव वेगामुळे अपघात घडत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे बोरी परिसरात वाहतूक नियंत्रणासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, या दुर्दैवी घटनेमुळे मृत तरुणाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

# लोणारमध्ये कर्करोग जनजागृती शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ५६ महिलांची थर्मल मॅमोग्राफी तपासणी; ८ प्रकरणांमध्ये आढळले असामान्य निष्कर्ष



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, लोणार (बुलडाणा) :** 'मी लोणारकर' टीम आणि ऊर्जा ऑन्कोलॉजी सेंटर यांच्या संयुक्त विद्यम ाने द ग्रँड विश्वनाथ हॉटेल लोणार येथे आयोजित करण्यात आलेल्या कर्करोग जनजागृती व मोफत थर्मल मॅमोग्राफी तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना जिल्हा प्रमुख बळीराम मापारी यांनी केले कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. खुशालराव मापारी तर प्रमुख माहुने म्हणून नगराध्यक्षा मीरा भुषण मापारी, प्रकाश मापारी, राजेश मापारी, प्रकाश धुमाळ, शनिलालजी बोराळकर, सूत्रसंचालन गजानन खरात यांनी केले.

या शिबिराचे मार्गदर्शन कर्करोग तज्ज्ञ डॉ.सुहास आग्रे आणि डॉ. माधुरा आंबेकर आग्रे यांनी केले. महिलांमध्ये स्तन कर्करोगाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात एकूण ५६ महिलांची थर्मल मॅमोग्राफी तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ८ म हिलांमध्ये असामान्य अथवा संशयास्पद निष्कर्ष आढळून आले असून त्यांना पुढील तपासण्या व तज्ज्ञ उपचारासाठी मार्गदर्शन करण्यात आले आहे.

शिबिरादरम्यान कर्करोगाचे लवकर निदान, वेळेवर उपचार आणि नियमित तपासणीचे महत्त्व याविषयी नागरिकांना माहिती देण्यात आली. ग्रामीण भागात आधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरल्याचे आयोजकांनी सांगितले. म ान्यवरणी आपले मनोगत व्यक्त केले

या उपक्रमासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी 'मी लोणारकर' टीम, वैद्यकीय तज्ज्ञ, स्वयंसेवक आणि स्थानिक नागरिकांचे विशेष सहकार्य लाभले.

# बेकायदेशीर डिझेलची वाहतूक करणारा टँकर जप्त !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२५, ठाणे :** मुंबई-नाशिक महाम ार्गावरील खारेगाव टोलनाक्याजवळ ठाणे शहर गुन्हे शाखा घटक- १ आणि शिधावाटप विभागाच्या संयुक्त पथकाने एक मोठी आणि धाडसी कारवाई केली आहे. खाद्यतेलाच्या नावाखाली बेकायदेशीररीत्या डिझेल सदृश ज्वलनशील पदार्थाची वाहतूक करणारा एक मोठा टँकर या पथकाने जप्त केला असून या कारवाईत तब्बल ४६ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

लोकांची दिशाभूल करण्यासाठी संबंधित टँकरवर 'ईडीबल ऑईल' (खाद्यतेल) असे लिहिण्यात आले होते. या प्रकरणी मुख्य आरोपी चालकासह एकूण ८ जणांविरुद्ध कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखा घटक-१ ला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे खारेगाव टोलनाक्याच्या अगोदर, मुंब्रा वळण रस्त्याजवळ सापळा रचण्यात आला होता. या ठिकाणी संशयास्पद टाटा कंपनीचा टँकर (क्रमांक एमएच-४६/ बीबी-७१३४) थांबवून त्याची तपासणी केली असता,




त्यात मोठ्या प्रमाणात ज्वलनशील द्रव पदार्थ आढळून आला. टँकर चालकाकडे या डिझेल सदृश पदार्थाची वाहतूक करण्याचा कोणताही परवाना, खरेदी बिल किंवा वैध कागदपत्रे नव्हती. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून उपनियंत्रक शिधावाटप विभाग, ठाणे यांच्या आदेशानुसार शिधावाटप अधिकारी सुभाष रामनाथ डुंबरे व त्यांच्या पथकाला तातडीने घटनास्थळी पाचारण करण्यात आले.

या संयुक्त तपासणीत टँकरच्या ५ कप्प्यांम ध्ये एकूण २५,००० लिटर बेकायदेशीर डिझेल सदृश पदार्थ आढळून आला. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये २४ लाख ५० हजार रुपये किमतीच्या २५,००० लिटर डिझेल सदृश पेट्रोलियम पदार्थाचा आणि २२ लाख रुपये किमतीच्या टाटा टँकरचा समावेश आहे.

नियमानुसार तपासणी अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून रासायनिक चाचणीसाठी नमुने गोळा केले असून, टँकर व इतर मुद्देमाल पोलिसांच्या स्वाधीन केला आहे.

या प्रकरणी मुख्य आरोपी चालक धर्मे द्रकुमार श्यामलाल पटेल (वय ३७ वर्षे, रा. वाशी, नवी मुंबई) याला अटक करण्यात आली आहे. तसेच टँकर मालक रितेश अभय नारायण सिंग (रा.दिवा, ठाणे) यांच्यासह पालघर व सुरत येथील रोशन शिरोडकर, नितीन कोली, राजू पंडित, दीपक पवार, सागर पाटील आणि अनिल सुरत या इतर ७ साथीदारांची नावे निष्पन्न झाली आहेत.

शिधावाटप अधिकारी सुभाष रामनाथ डुंबरे यांच्या फिर्यादीवरून सर्व आरोपींविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५, मोटार स्पीरीट अँड हायस्पीड डिझेल ऑर्डर २००५ आणि बायोडिझेल धोरण २०२१ च्या विविध कलमांन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस निरीक्षक अशोक रावजी उतेकर या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

## संपादकीय

### रस्त्यांवरचे राज्यकर्ते!

गाढवं, माकडं, अन् पुन्हा कुत्र्यांचा उपद्रव भारतात माणसांपेक्षा प्राणीच जास्त प्रसिद्धी मिळवताहेत का काय, असं वाटावं असं सध्याचं चित्र. भटक्या कुत्र्यांचा दिल्लीपासून गल्लीपर्यंत वाढलेला उपद्रव अनेक ठिकाणी भयावह बनलेला आहे. देशातील विविध राज्यांतून आलेल्यांचे याबाबतीतले अनुभव ऐकले की प्रश्न पडतो की आपण आधुनिक शहरांत राहतो की एखाद्या जंगल व्यवस्थेत? सकाळी फिरायला गेलेल्या आबालवृद्धांचा पाठलाग, शाळेत जाणाऱ्या मुलांवर झुंडीने धावून जाणं, रात्री उशिरा घरी परतणाऱ्या प्रवाशांना घेरणं, दुचाकीस्वारांवर अचानक झेपावणं भटक्या कुत्र्यांचे हे अनुभव अपवाद राहिलेले नाहीत.

आपल्या देशात दोन गोष्टी सर्वाधिक सर्वव्यापी आणि सर्वसाक्षी असाव्यात, आश्वासनं आणि भटके श्वान. फरक इतकाच की आश्वासनं आणि ती देणारे बहुतेकदा निवडणुकीनंतर गायब होतात; पण हे भटके कुत्रे गल्लीबोळांत चोवीस तास कायम असतात. सरकारं, मंत्री बदलतात, योजनांची नावं वगैरे बदलतात; पण देशाच्या गल्लीगल्लीतील भटक्या कुत्र्यांच्या टोळक्यांचे राज्य अबाधित असतं. सर्वोच्च न्यायालय, सरकारे आणि प्राणीप्रेमी यांच्यात सुरू असलेलं ताजं महाभारत पाहिलं तर प्रत्येकी लाखोंच्या घरात मेहनताना घेणाऱ्यांसह शेकडो वकिलांची फौज सर्वोच्च न्यायालयात ज्या प्रश्नावर शब्दास्त्रं पाजळत उभी राहिली, ते पाहून गल्लोगल्ली फिरणाऱ्या या श्वानांना 'भटकी' किंवा 'मोकाट' अशी विशेषणं लावून माणूस त्यांचा अपमान तर करत नाही ना, असं वाटून जातं.

मुलं, वृद्ध आणि प्रवासी यांच्यावर होणाऱ्या कुत्र्यांच्या हल्ल्यांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, असं सांगाताना न्यायालय म्हणतं, यांची नसबंदी करा, लसीकरण करा, आश्रयस्थानं उभारा, वैज्ञानिक व्यवस्थापन करा. मग राज्य सरकारं म्हणतात पैसा नाही, प्रशासन म्हणतं, मनुष्यबळ नाही, पालिका–महानगरपालिका म्हणतात, आमच्याकडं जागा नाही आणि नागरिक म्हणतात, 'आश्रयस्थानं आमच्या भागात नको.' म्हणजे प्रश्न सुटणारच नाही याकडेच सारी वाटचाल! आता कदाचित लवकरच 'राष्ट्रीय भटके श्वान व्यवस्थापन, निरीक्षण व पुनरावलोकन समिती' स्थापन झाली तरी नवल वाटू नये.

न्यायालयाचे ताजे आदेश प्रत्यक्षात अव्यवहार्य आहेत अशी टीका माजी मंत्री मनेका गांधी यांनी केली. मग भाजप नेते विजय गोयल यांनी, ज्यांना या भटक्या कुत्र्यांचा इतका कळवळा येतो त्यांनी त्यांना घरी न्यावं, अशी उपरोधिक सूचना केली. गांधी आणि गोयल या उभयतांचं स्वपक्षातलं सध्याचं स्थान पाहिलं तरी कदाचित यालाही पक्षांतर्गत लोकशाहीचं जिवंत उदाहरण म्हटलं जाईल.

मुळात ज्या देशाच्या शहरा शहरांत कचरा व्यवस्थापन कोलमडलं आहे, वाहतूक नियंत्रण अस्ताव्यस्त आहे, फुटपाथ अतिक्रमणाखाली अदृश्य झालेत आणि खड्ड्यांनी रस्ते कायमस्वरूपी जायबंदी, तिथं भटक्या कुत्र्यांचं चोख व्यवस्थापन त्वरित होण्याची अपेक्षा ठेवणं म्हणजे एखाद्या रेल्वेगाडीतल्या ओसंडून वाहणाऱ्या जनरल डब्यात 'उभं राहून योगासनं करा' असा सल्ला देण्यासारखंच!

या कुत्र्यांना खाऊ घालणारे म्हणतात, 'तेही जीव आहेत.' तर रस्त्यावर हल्ले सहन करणारे विचारतात, 'मग आमच्या जिवाचं काही मोल नाही का?' नसबंदी, लसीकरण, स्थलांतर या प्रत्येक उपायावर मतमतांतरे आहेत. प्रशासन किंवा मायबाप सरकार नेहमीप्रमाणे एकच उत्तर देतं की 'लेखी तक्रार द्या.' मग त्याची फाईल बनते व क्रमांक १ वरून क्र. १० वगैरे टेबलांपर्यंत प्रवास केल्यावर त्या फायलीवर शेरा येतो 'कार्यवाही सुरू आहे' आणि हे वाक्य एकदा फाईलवर लिहिलं गेलं की आपल्या वेबमिन्स्टर पद्धतीत त्या प्रश्नालाच जणू मोक्षप्राप्ती होते, हा अपवाद वगळता सार्वत्रिक अनुभव.

भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर सर्वोच्च न्यायालयाने आता उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला आहे. दिल्लीत संसद परिसरापासून अनेक ठिकाणी माकडांचाही उपद्रव प्रचंड. नागरिकांची भीती अनाठायी नाही व प्राण्यांवर निष्कारण क्रूरता होऊ नये हे श्वानप्रेमींचं म्हणणं आहे. मुळात या समस्येवर आपल्याला खरंच उपाय हवा आहे का, की फक्त वाद? उपाय करायचा असेल तर तो कठीण आहे, खर्चिक आहे आणि दीर्घकालीन आहे. वाद हवा असेल तर त्याला पैसे पडत नाहीत.

– मंगेश वैशंपायन

# झुरळ पार्टी टिकेल की हुकेल ?

१५ मे २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बनावट पदव्या वापरून नोकऱ्या मिळवणाऱ्या प्रवृत्तीवर भाष्य करताना 'कॉकरोच' (झुरळ) या शब्दाचा उल्लेख केला होता. नंतर त्यांनी स्पष्ट केले की हा शब्द केवळ बनावट पदव्या घेणाऱ्यांसाठी होता; सर्वसामान्य बेरोजगार तरुणांसाठी नव्हता. मात्र, सोशल मीडियावरील तरुणांनी या विधानावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

अभिजित दिपके यांनी याच विधानाचा आधार घेत उपरोधिक पद्धतीने कॉकरोच जनता पार्टीची स्थापना केली. त्यांनी या पक्षाला आळशी आणि बेरोजगारांचा आवाज असे संबोधले असून, पक्षात सामील होण्यासाठी काही गमतीशीर अटीही ठेवल्या आहेत.

**१) व्यक्ती बेरोजगार असावी.**
**२) स्वभावाने आळशी असावी.**
**३) सोशल मीडियावर चोवीस तास सक्रिय ('क्रॉनिकली ऑनलाइन') असावी.**
**४) व्यवस्था किंवा परिस्थितीविरोधात हुशारीने आणि जाहीरपणे 'रँट' (राग व्यक्त) करण्याची कला अवगत असावी.**

केवळ चेष्टा म्हणून सुरू झालेल्या या मोहिमेला तरुणांचा इतका प्रचंड प्रतिसाद मिळाला की देशातील अनेक मोठ्या राजकीय नेत्यांनी आणि सेलिब्रिटींनीही याची दखल घेतली. ही सोशल मीडियावरील काही दिवस किंवा काही महिने टिकणारी ऑनलाइन लाट ठरेल की चळवळ बनेल, हे येणारा काळच ठरवेल.

प्रतिकात्मकता हे भारतीय राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पक्षचिन्हांच्या निवडीतून स्वतःची विचारसरणी प्रतिबिंबित करण्याचा आणि जनतेचा दृष्टिकोन घडवण्याचा अथवा बदलण्याचा प्रयत्न केला




जातो. आता या झुरळ पक्षाला झुरळ हेच प्रतीकात्मक षट्पदी कीटक मिळाले आहे. त्याच्या वर्तनवैशिष्ट्यांचा उपयोग करून घेण्याची तयारी हा पक्ष करताना दिसतो. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही स्वतःला तग धरून ठेवण्याची क्षमता झुरळात असते; तीच क्षमता आमच्यातही आहे, हे सांगण्याचा या नव्या पक्षाचा हेतू दिसून येतो.

एखादा पक्ष उभा करणे म्हणजे तोंडची गोष्ट नाही, हे झुरळ पक्ष स्थापन करणाऱ्यांनाही ठाऊक आहे. भारतीय समाजाची नस ओळखता ओळखता येथील दिग्गज राजकारणी साठी पार करतात; तेव्हा कुठे त्यांना एखाद्या राज्यात आपले बस्तान बसवता येते. याला अरविंद केजरीवाल यांचा 'आप' आणि थलपती विजय यांचा 'टीव्हीके' यांसारखे पक्ष अपवाद ठरतात. परंतु भारतातील विविध जाती, भाषा, आर्थिक स्तर, शेतकरी–कामगार आणि विविध हितसंबंध जपणारे गट समजून घेण्यासाठी मोठा संयम आणि समजूतदारपणा आवश्यक असतो. एखाद्या सोशल मीडिया ट्रेंडवरून परिवर्तनाच्या गप्पा मारणे म्हणजे हवेत इमले बांधण्यासारखे आहे. समाजात मिसळल्याशिवाय, लोकांच्या समस्या जाणून घेतल्याशिवाय आणि त्यांच्यासाठी रचनात्मक व पायाभूत काम केल्याशिवाय कोणताही विचार किंवा पक्ष भारतात आपले बस्तान बसवू शकत नाही.

येणारा काळ हा 'जेन झी'चा आहे. त्यांना हवे तसे अवकाश निर्माण करण्याचे स्वातंत्र्य निश्चितच आहे. श्रीलंका, बांगलादेश आणि नेपाळ या देशांमध्ये जेन झीने परिवर्तन घडवून आणले आहे. वीस ते तीस वर्षे वयोगटातील हा तरुण वर्ग आज अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. बेरोजगारी हे त्यांच्या समोरील संकट आहे. आपण घेतलेली पदवी आपल्याला रोजगार देऊ शकत नाही, हा विचार तरुणांना अस्वस्थ करत आहे.

आजूबाजूला दिसणारी अनियमितता आणि भ्रष्टाचार यामुळे जेन झी कमालीची उद्विग्न आहेत . नीट पेपरफुटीसारख्या घटना घडल्यानंतर त्यांच्या मनातील खदखद व्यक्त करण्यासाठी त्यांना पुरेशी संधीही मिळत नाही. यावर व्यक्त होणे किंवा निषेध नोंदवण्यासाठी वेळ देणे प्रत्येकालाच शक्य होत नाही; पण त्यांच्या मनात संताप आहे, हे मात्र निश्चित.जेन झी हा इंटरनेट आणि सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असलेला वयोगट आहे. त्यांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे झटपट मिळतात; मात्र ती समाधानकारक असतीलच असे नाही आणि ती पूर्णपणे अचूक असतील, याचीही खात्री देता येत नाही.

आपल्या देशातील या तरुणांना एक गोष्ट निश्चितपणे ठाऊक आहे की भारतात संविधानावर आधारित लोकशाही व्यवस्था आहे. संविधान कितीही चांगले असले आणि ते वापरणारे लोक ˉ राज्यकर्ते व नागरिक ˉ जर वाईट असतील, तर ते संविधानही वाईट ठरेल. तसेच संविधान कितीही वाईट असले, तरी ते राबवणारे लोक जर चांगले असतील, तर ते उत्तम प्रकारे कार्य करेल, असे स्पष्ट मत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले होते. याची पुरेपूर जाणीव आजच्या तरुणांनी ठेवली पाहिजे.इतर देशांतील तरुणांप्रमाणे भारतातील जेन झी रस्त्यावर उतरून जाळपोळ किंवा नासधूस करत उद्रेक करणार नाही; कारण नैतिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संस्कारांच्या बाबतीत भारतीय तरुण इतर देशांतील तरुणांपेक्षा निश्चितच वेगळा आणि अधिक संयमी आहे. त्याला संविधानिक मार्गानेच पुढे जावे लागेल. अर्थातच तो मार्ग महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीप्रमाणे व्यापक आणि सर्वमान्य ठरणारा असाच निवडावा लागेल. कोणत्याही पक्षाला भारतात टिकण्यासाठी जी संविधानाने तयार केलेली पायाभूत मांडणी आहे ती अंगीकारावी लागेलच तरच तो पक्ष टिकेल नाहीतर कायमचा हुकेल....

– किशोर जाधव,सोलापूर
– मो. नं. ९९२२८८२५४१

# लोकांतील, लोकांचा लोकनेता : विलासराव देशमुख

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांची आज ८१ वी जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २६ मे १९४५ रोजी लातूरमधील बाभळगावमध्ये त्यांचा जन्म झाला. विलासरावांनी पुण्यात बीएससी, बीए, एलएलबी यासारखे उच्च शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण झाल्यावर विलासराव आपल्या गावी बाभळगावला परतले. १९७४ साली विलासराव बाभळगाव चे सरपंच झाले. १९७५ पासून ते काँग्रेसचे क्रियाशील कार्यकर्ते बनले. १९८० साली त्यांनी पहिल्यांदा लातूर विधानसभा मतदार संघातून आमदारकीची निवडणूक लढवली आणि पहिल्याच प्रयत्नात ते आमदार म्हणून ते निवडून आले. १९८२ साली त्यांची महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणून निवड झाली. त्यांनी कृषी, ग्राम विकास, सहकार, शिक्षण, तंत्रशिक्षण, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. १९८६ साली ते महसूल आणि सहकार या महत्वाच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री बनले.

उद्योग आणि सांस्कृतिक खात्याचे मंत्री म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मंत्री म्हणून त्यांनी केलेल्या कामामुळेच ते सलग तीनदा विधानसभेत निवडून गेले मात्र १९९५ सालची विधानसभा निवडणूक त्यांना जिंकता आली नाही. १९९२– ९३ साली झालेल्या दंगली आणि बॉम्बस्फोट, काँग्रेसमधील सुंदोपसुंदी, तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांच्यावर झालेले आरोप, एनरॉन प्रकरण यामुळे काँग्रेसचा पराभव झाला. काँग्रेसच्या अनेक दिग्गज नेत्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. त्यात विलासरावांचाही समावेश होता. विलासराव देशमुख यांना जनता दलाच्या शिवाजी कव्हेकर यांनी पराभूत केले. आपल्या गडात झालेला पराभव विलासरावांना खूप लागला. विलासराव देशमुख पडावेत यासाठी तेंव्हा काँग्रेसमध्ये असलेल्या बड्या नेत्याने प्रयत्न केल्याचे तेंव्हा बोलले जात होते. १९९५ साली राज्यात भाजप शिवसेना युतीचे सरकार आले. मनोहर जोशी मुख्यमंत्री बनले. काँग्रेसचे अनेक दिग्गज नेते विधिमंडळात नाही याची विलासरावांना खंत वाटत होती त्यामुळे काहीही करून विधिमंडळात जायचे असा चंग त्यांनी बांधला.

पुढच्याच वर्षी म्हणजे १९९६ साली विधानपरिषद निवडणूक लागली मात्र काँग्रेसच्या हायकमांडने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे बंडखोरी करून विधान परिषदेसाठी उभे रहा असा आग्रह त्यांना त्यांच्या समर्थकांनी केला. काँग्रेसच्याही अनेक नेत्यांनी त्यांना तसा सल्ला दिला. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी तर त्यांना थेट शिवसेनेत येण्याची ऑफर दिली मात्र सारं आयुष्य काँग्रेस संस्कृतीत



गेल्याने शिवसेनेत जाणं विलासरावांना शक्य नव्हतं म्हणून ते या निवडणुकीत अपक्ष म्हणून उभे राहिले. या निवडणुकीत शिवसेनेने त्यांना मदत केली तरीही त्यांचा अवघ्या अर्ध्या मतांनी पराभव झाला. विधान परिषद निवडणुकीत प्रत्येक मताला ठराविक मूल्य असतं आणि मत मोजण्याची पद्धतही वेगळी असते. सलग दोन वर्षात दोन पराभव झाल्याने विलासरावांचे राजकारण संपले, विलासराव आता पुन्हा निवडून येऊ शकत नाही अशी टीका त्यांच्यावर होऊ लागली मात्र हार मानतील ते विलासराव कसले ? विलासरावांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली. जनतेत गेले, जनतेचे प्रश्न शासन दरबारी मांडले त्याचे परिणाम लवकरच दिसले. १९९९ साली शरद पवार काँग्रेस मधून बाहेर पडले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. त्याच वर्षी म्हणजे १९९९ साली विधानसभेच्या निवडणुका लागल्या.

या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस एकमेकांच्या विरोधात लढले तर शिवसेना भाजपने युतीत एकत्र निवडणुका लढवल्या. एकत्र लढूनही भाजप सेना युतीला बहुमत मिळाले नाही त्या दोन्ही पक्षांना मिळून १२५ जागा मिळाल्या तर स्वतंत्र लढलेल्या काँगेसला ७५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला ५८ जागा मिळाल्या. निकाला नंतर काँग्रेस राष्ट्रवादी यांच्यात सरकार स्थापने साठी बोलणी सुरू झाली. छोट्या मोठ्या पक्षांनी देखील काँगेस आघाडीला पाठिंबा देण्याचे जाहीर केले. सर्वाधिक जागा काँग्रेसच्या निवडून आल्याने काँग्रेसचाच मुख्यमंत्री होणार हे स्पष्ट झाले. काँग्रेस कडून लातूर मतदार संघातून विलासराव देशमुख सर्वाधिक मते घेऊन जिंकून आले होते. ज्या मतदार संघात त्यांचा पराभव झाला होता त्याच मतदार संघात ते पुन्हा विक्रमी मतांनी निवडून आले होते त्यामुळे मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीत ते सर्वात पुढे होते शिवाय अपक्ष म्हणून जिंकून आलेल्या आमदारांनीही विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री असावेत अशी अट ठेवल्याने काँग्रेस हायकमांडने त्यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी निवड केली. जिंकून आलेल्या सर्व आमदारांनी विलासरावांना एकमुखी पाठिंबा दिला आणि ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बनले.

सलग दोन पराभव स्वीकारून ही थेट मुख्यमंत्रीपद मिळाल्याने विलासरावांची पराभवाची सल दूर झाली. काँगेस राष्ट्रवादी काँग्रेस आघाडी सरकारचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी अतिशय चांगले काम केले पण २००३ साली त्यांना राजीनामा द्यावा लागला मात्र अवघ्या वर्षभरात म्हणजे २००४ साली त्यांची मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली २००४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिंकून आलेल्या काँग्रेसच्या सर्व आमदारांनी विलासराव देशमुख हेच मुख्यमंत्री हवेत अशी मागणी केल्याने त्यांचीच पुन्हा मुख्यमंत्री म्हणून निवड करण्यात आली. २००४ साली विलासराव दुसऱ्यांना मुख्यमंत्री बनले. मुख्यमंत्री पदाच्या दुसऱ्या कार्यकाळातही त्यांनी चांगले काम केले मात्र २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला आणि त्यांचे मुख्यमंत्रीपद गेले मात्र अल्पावधीतच त्यांची केंद्रात कॅबिनेट मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. मनमोहन सिंग यांच्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. १४ ऑगस्ट २०१२ रोजी विलासरावांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. त्यांचे आकस्मिक निधून महाराष्ट्रातील जनतेला धक्का देऊन गेले. त्यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला.

**विलासराव देशमुखांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### उन्हाळी

उष्मा घात भयानक
आधाशी घेतोयंबळी
माय माती सेवा करी
कामाव्यग्र राजाबळी

पोशिंदा राबे सारखा
कामे करतो उन्हाळी
फिकीरनाही कुणांस
चारथेंब उतरे वेगळी

रोजंदारीत मग्नमजूर
अव्याहत घाम गाळी
पर्याय नाही कामाला
पोटातली आगजाळी

उन्हांस भ्यालीसावली
जाळली रोपे कोवळी
बोगनवेल सजवलेली
तटस्थसोसते बाभळी

पशुपक्षी मूक साहती
अवस्था नाही वेगळी
कसे झेलावा उन्हाळा
वाट पाहतात सगळी

महापूर येतो गतवर्षी
तरीशुष्क आता तळी
कोणसांग जबाबदार
घसरली जल पातळी

जल नियोजन करावे
ओरडे कानी कपाळी
कर्तृत्व नडले आपले
दुर्भाग्य नोंदी कपाळी

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वार्ता, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयच्या विद्यार्थ्यांचे स्कॉलरशिपमध्ये घवघवीत यश



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२५, बुलढाणा :** श्री शिवाजी विद्यालय बुलढाणा येथील इयत्ता पाचवी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमधून कु. प्रीती उचाडे. कु. निशा कदम कु.कल्याणी घोटे.कु. मनश्री इंगळे, कुणाल मेडकर, मिलिंद मोरे, यश मुहाडे, प्रणव वानखेडे या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. यानिमित्त शालेय प्रशासनातर्फे विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे स्कॉलरशिप इन्चार्ज शिक्षक श्री.निकास, श्री.साळोक, श्री.सावळे, पीवतकर मॅडम, सावळे मॅडम, श्री.देशमुख यांचे सुद्धा शालेय प्रशासनातर्फे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला शाळेचे प्राचार्य श्री.कावरे, पर्यवेक्षक श्री.ढोमणे तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## रांजणगाव रोड येथे कुस्ती आखाडा कामाचे उदघाटन



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२५, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील रांजणगाव रोड या ठिकाणी गोसावी बाबा मंदिराजवळ नवीन कुस्ती आखाडा कामाचे उद्घाटन आज सोमवार दिनांक २५ रोजी करण्यात आले उद्घाटन प्रसंगी रांजणगावचे माजी सरपंच आप्पासाहेब शिंदे पाटील, सरपंच महेश देशमुख, उपसरपंच शिवाजी शिंदे, आप्पासाहेब देशमुख, चेअरमन अंकुशराव जवक, ज्ञानदेव लोणकर, सुरेश गाढवे, आप्पा गाढवे, काशिनाथ लोणकर, विलास गाढवे, आबासाहेब शिंदे, रमेश शिंदे, मनोहर कदम, चांगदेव जवक, विलासराव देशमुख, विक्रम गारकर, हरी शिंदे , चंद्रकांत शिंदे, अनिल गाढवे इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचा नारळ पारनेर पैलवान प्रकाश गाढवे यांच्या हस्ते फोडून काम चालू करण्यात आले.

## पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे अवैध वाळू साठ्यावर कारवाई



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२५, पंढरपूर :** पंढरपूर शहर आणि तालुक्यात पोलिस आणि महसूल प्रशासनाच्या वतीने धडक म ोहीम राबविण्यात येत असून आंबे या परिसरात सुमारे १०० ब्रास वाळू आणि दोन टिपर , एक जेसीबी जप्त करण्यात आले आहेत. सहा. पोलीस अधिक्षक . प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने अवैधरीत्या वाळू उत्खनन व वाहतुकीवर कारवाई सोमवार दिनांक २५मे रोजी सकाळी केली. रोंगे, हेंबाडे, हुलजंती व पोलीस नाईक शिंदे यांनी गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आंबे येथील नदीकाठ परिसरात अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर कारवाई करण्यात आली असून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी भेट दिली असता वैभव नागणे याच्या वाळू रॅम्पवर दोन टिप्परमध्ये वाळू भरत असल्याचे निदर्शनास आले. सदर ठिकाणी अंदाजे १०० ब्रास वाळूचा साठा आढळून आला असून अवैधरित्या वाळू उत्खनन सुरू असल्याचे स्पष्ट झाले.

कारवाई दरम्यान पोलीस पथकाने जेसीबी मशीन थांबविण्याचा प्रयत्न केला असता संबंधित जेसीबी चालक तसेच एका यारी ट्रॅक्टर चालकाने पोलीस पथकास पाहून वाहनांसह घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी घटनास्थळी मिळून आलेली वाहने ताब्यात घेतली असून त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे. यावेळी टिप्पर क्रमांक बी आर २जी ए ३१८८, चालक – गणेश गांडुळे, मालक - प्रकाश गायकवाड, टिप्पर क्रमांक उपलब्ध नाही चालक – सिद्धू लाला कांबळे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

तसेच घटनास्थळावरून पळून गेलेल्या जेसीबीचा मालक नागेश आसबे, रा.गोपालपूर असल्याचे निष्पन्न झाले आहे. संबंधित आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू असून अवैध वाळू उत्खनन व वाहतूक प्रकरणी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. सदर प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास पोलीस विभागामार्फत करण्यात येत आहे. अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात पोलीस प्रशासनाकडून पुढील काळातही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

## कोलारा गाव तलाव परिसरात भिषण आग



**अक्षराज : नितेश पाटील**

**दि.२५, चिमूर (चंद्रपूर) :** ताडोबा व्याघ्र प्रकल्पाचे कोअर गेट प्रसिद्ध असलेल्या कोलारा येथील मामा तलाव जवळ अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे.आज सोमवारी सकाळी अकरा वाजता आगेचा भडका शाळेकरी मुलांना दिसला. माहिती सुनिल गणविर यानी आरडाओरड केला गणेश येरमे यांना घटणेची माहिती मि ळताच तलावाकडे धाव घेतली आगेचा रुद्र अवतार बघता ग्राम पंचायत सदस्य गणेश येरमे, सचिन डाहुले, संजय ठाकरे यानी तहसिलदार राजमाने यांना भ्रमनध्वनी वरुण घटनेची माहिती दिली. त्यानी घटना स्थळावर अग्नीशामक दलाची गाडी पाठवली.

गावात आग पोहचण्यास हाकेच्या अंतर असल्याने शोभा कोयचाडे यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी (कोर) वैद्य व मनोहर वाघमारे आणि edc अध्यक्ष मधूकर जिवतोडे यांनी बफर वन कर्मचारी यांना माहिती दिली वनरक्षक जरारे यासह PRT टिम यांच्या माध्यमातून वनकर्मचारी यानी वन खात्यातील फायर याना बोलवून आग आटोक्यात आणण्यास मदत झाली.

आगेचा रुद्र भडका बघता गावातील महीला पुरुष युवक युवतीने आग विझवण्यास मदत केली. गावकऱ्यांच्या मदतीने मोठा अनर्थ टळला घटना स्थळाला तलाठी श्रद्धा भोयर यानी भेट दिली.

# राहुरी खुर्दमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न अधिकच गंभीर!

### वारंवार खंडित होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२५, राहुरी :** राहुरी खुर्द ग्रामपंचायत हद्दीत पाणीटंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असून नागरिकांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. १४ गाव पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन वारंवार बंद पडत असल्याने गावातील पाणीपुरवठा सातत्याने खंडित होत आहे. मात्र, संबंधित यंत्रणेकडून वेळेत दुरुस्ती होत नसल्याने नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

विशेष म्हणजे दिनांक १९ मे रोजी गावातील पाणीपुरवठा खंडित झाल्यानंतर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतरही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झाली नसल्याचे चित्र असून पुन्हा आज सोमवार दिनांक २५ मे रोजी दुसऱ्यांदा पाणीपुरवठा बंद झाल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. वारंवार होणाऱ्या या समस्येमुळे महिलांसह पुरुषांनाही पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे.

गावातील अनेक नागरिकांना म ोटरसायकलवर ड्रम बांधून दूरवरून पाणी आणावे लागत आहे. तर काही कुटुंबांना खासगी टँकरचा आधार घ्यावा लागत असल्याने आर्थिक भारही वाढला आहे. ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अवघ्या काही दिवसांपूर्वी महिलांनी ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढून प्रशासनाचा निषेध केला होता. नियमित पाणीपुरवठा करा अन्यथा आंदोलन तीव्र करू, असा इशारा देखील महिलांनी दिला होता. मात्र, त्यानंतरही पाणीपुरवठा सुरळीत न झाल्याने ग्रामस्थ प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. जर ग्रामपंचायतीला नियमित व पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा देता येत नसेल, तर नागरिकांकडून १०० टक्के पाणीपट्टी कशाच्या आधारावर वसूल केली जाते? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. नियमित सेवा मिळत नसताना पूर्ण कर आकारणे अन्यायकारक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, सततच्या पाणीटंचाईमुळे गावातील काही नागरिकांनी स्वतःच्या खर्चाने बोअरवेल घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र, सर्वसामान्य नागरिकांना आजही पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने गावात असंतोष वाढत आहे. तसेच अनियंत्रित बोअरवेलमुळे भविष्यात भूजल पातळी खालावण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

ग्रामस्थांनी संबंधित वरिष्ठ प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून राहुरी खुर्दमधील पाणीपुरवठा सुरळीत करावा, १४ गाव पाणीपुरवठा योजनेतील त्रुटी दूर कराव्यात तसेच ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार म ागणी केली आहे.

## पोंभुर्णा येथे कृषी निविष्ठा धारकांची खरीप हंगाम पूर्व आढावा सभा संपन्न



**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**

**दि.२५, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** तालुका कृषी अधिकारी कार्यालय पोंभुर्णा, येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालय सभागृहात नुकतीच कृषी निविष्ठाधारकांची खरीप हंगाम पूर्व नियोजन सभा व साथी पोर्टलद्वारे बियाणे विक्रीबाबत प्रशिक्षण पार पडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका कृषी अधिकारी एस.एम ढोबळे मॅडम होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी अधिकारी गुण नियंत्रण गणेश गवळी, उपकृषी अधिकारी एस.जि.कोसरे उपकृषी अधिकारी श्रीम. व्हि.डी.भाले मॅडम आदी उपस्थित होते. यावेळी कृषी अधिकारी गुण नियंत्रण गणेश गवळी यांनी उपस्थित कृषी निविष्ठाधारकांना परवाना, ई-पॉस मशिन, दर फलक, साठा फलक अद्यावत ठेवण्याच्या सुचना दिल्या. तसेच शेतकऱ्यांना दर्जेदार बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके पुरविण्याबाबत सखोल मार्गदर्शन केले. शासनाच्या प्राप्त सुचनेनुसार २०२५-२६ या वर्षापासून साथी पोर्टलवरुन बियाण्यांची विक्री करणे बंधनकारक केले असल्याचे सांगितले. तसेच युरिया Top-20 विक्रीविषयी निविष्ठा धारकांना माहिती सांगीतली व खरीप हंगामात

कृषी संचालकांना उद्भविणाऱ्या शंकाचे निराकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका कृषी अधिकारी श्रीम. एस.एम.ढोबळे यांनी केले. सुत्रसंचलन उपकृषी अधिकारी एस.जि.कोसरे यांनी केले. तर आभार उपकृषी अधिकारी श्रीम.व्हि.डी.मानकर यांनी मानले. कार्यक्रमाला कृषी केंद्र चालक संघटना अध्यक्ष पुंडलिक वासनवार सचिव प्रसाद शादरपवार, व पोंभुर्णा तालुक्यातील कृषी केंद्र संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या पाठपुराव्याला यश ; माथेरान पाणी प्रश्नावर तातडीने उपाययोजना



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२५, माथेरान :** माथेरान शहरात गेल्या महिनाभरापासून तीव्र होत चाललेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूम ीवर नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी घेतलेल्या पुढाकाराला यश मिळताना दिसत आहे. नेरळ–कुंभे येथून म ाथेरानला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात जुम ापट्टी, वॉटर पाईप तसेच फिल्टर हाऊस येथील पंप वारंवार बंद पडत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते.

पर्यटन हंगाम सुरू असतानाच निम ्ाण झालेल्या या संकटामुळे स्थानिक नागरिक, हॉटेल व्यावसायिक आणि पर्यटकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.या गंभीर परिस्थितीची दखल घेत नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पनवेल येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन वारंवार बिघाड होणारे जुने पंप तातडीने बदलून त्या ठिकाणी योग्य क्षमतेचे नवीन पंप बसविण्याची मागणी केली. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर एक नवीन पंप उपलब्ध करून देण्यात आला असून तो उद्या सकाळपर्यंत वॉटर पाईप येथे कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.यासोबतच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत आणखी एक नवीन पंप उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही मिळाले आहे. शहरातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी सध्या सर्व उपलब्ध पंप सुरू करण्यात आले असून प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे.

दरम्यान, वेंगुर्लेकर साहेब यांनी राठोड साहेब तसेच मेंटेनन्स विभागाला १० जूनपर्यंत माथेरानमध्ये पूर्णवेळ वास्तव्यास राहून पाणीपुरवठा व्यवस्थेवर सातत्याने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. आवश्यक ती तत्काळ दुरुस्ती व कार्यवाही करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. नेरळ ते दस्तुरी मार्गावर काही अनधिकृत नळजोडण्या समोर आल्यानेही पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व समस्यांवर प्रशासनाकडून सम न्वयाने काम सुरू असून, नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी उप नगराध्यक्ष संतोष शेलार, नगरसेवक गौरंग वाघेला यांच्या तत्परतेमुळे माथेरानचा पाणीप्रश्न पुढील एक–दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शाळांमधील शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना 'आभा' कार्ड बंधनकारक !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** १०० टक्के अनुदानित खाजगी शाळा तसेच जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी शासनाच्या नवीव निर्णयानुसार, आता सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांना आयुष्यमान भारत हेल्थ अकाऊंट (आभाकार्ड) काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. ज्या कर्मचाऱ्यांकडे हे 'आभा' कार्ड नसेल, त्यांची ५ लाख रुपयापर्यंतची वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके यापुढे स्विकारली जाणार नाहीत, असा स्पष्ट इशारा शिक्षण उपसंचालकांनी परिपत्रकातून दिला आहे.

शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांकडून त्यांना कॅशलेस वैद्यकीय सुविधा मिळाव्यात, अशी सातत्याने मागणी केली जात होती. या मागणीचा प्रस्ताव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय घेताना शासनाने स्पष्ट केले आहे कि, राज्याच्या सर्व अधिवासी नागरिकांना (ज्यांच्याकडे शुभ्र/पांढरी शिधापत्रिका आहे अशांसह) विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना याअंतर्गत प्रती कुटुंब प्रति वर्ष ५.०० लाख रुपयांचे आरोग्य संरक्षण कवच लागू आहे. याच योजनेमध्ये आता राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्यांकडे ' आभा' कार्ड असणे आवश्यक आहे.

**'आभा' कार्डचे महत्व :**

'आभा' कार्ड हे डिजिटल इंडिया अंतर्गत तयार केले जाणारे एक डिजिटल हेल्थ आयडी कार्ड आहे. यामध्ये संबंधित कर्मचाऱ्यांच्या आरोग्याविषयीची सर्व माहिती, आजारपण आणि उपचारांची नोंद डिजिटल स्वरुपात साठविली जाते. यामुळे अंगीकृत रुग्णालयात गेल्यावर कागदपत्रांची जत्रा न बाळगता थेट आणि जलद उपचार मिळणे शक्य होते.

शासनाच्या शिक्षण संचालक कार्यालयाने जारी केलेल्या अधिकृत पत्रांनुसार कॅशलेस सुविधेचा मार्ग मोकळा झाला असून अंगीकृत रुग्णालयांद्वारे कर्मचाऱ्यांना रोखविरहित उपचारांची सोय मिळणार आहे. वर्षाला ५ लाख रुपयापर्यंतचे मोफत उपचार या योजनेद्वारे घेता योतील. तसेच यापुढे ५ लाख रुपयापर्यंतच्या खर्चाची कोणतीही वैद्यकीय देयके जुन्या पध्दतीने कार्यालयात स्विकारली जाणार नाहीत. थेट योजनेतूनच लाभ घ्यावा लागेल. याबाबत 'आभा' कार्ड काढण्याची संपूर्ण कार्यपध्दती आणि मार्गदर्शक लिंक संबंधित कार्यालयामार्फत शाळांना पाठविण्यात आली आहे. त्यानुसार सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतील १०० टक्के कर्मचाऱ्यांचे 'आभा' कार्ड वेळेत काढून घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अन्यथा वैद्यकीय बिले रखडणार असल्याचा इशारा शासनाच्या परिपत्रकातून दिला आहे.

# दोन दिवसीय जिल्हा महानगर प्रशिक्षण वर्गाला उत्साहात प्रारंभ

## विचार, संघटन आणि कार्यकर्त्यांच्या बळकटीकरणाचा संकल्प; विविध मान्यवरांचे मार्गदर्शन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२५, चंद्रपूर :** भारतीय जनता पक्ष, चंद्रपूर जिल्हा महानगर तर्फे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय जिल्हा प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत दोन दिवसीय जिल्हा महानगर प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. पक्षाची विचारधारा अधिक सक्षमपणे तळागाळापर्यंत पोहोचविणे, संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करणे आणि कार्यकर्त्यांमध्ये वैचारिक व नेतृत्वक्षमतेचा विकास घडविणे या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या प्रशिक्षण वर्गाला पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

बोर्डा येथे आयोजित या प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटन सोहळ्याला चंद्रपूर जिल्ह्याच्या प्रभारी अर्चनाताई डेहनकर, राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, आमदार किशोर जोरगेवार, भाजपचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टुवार, अशोक जिवतोडे, वर्ग प्रमुख तथा महामंत्री रविंद्र गुरुनुले, माजी महापौर अंजली घोटेकर, तुषार सोम आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रशिक्षण वर्गात पहिल्या सत्रात कार्यकर्ता विकास, सांभाळ व अपेक्षा या विषयावर मार्गदर्शन करताना हंसराज अहिर यांनी कार्यकर्त्यांनाच पक्षाची खरी शक्ती असल्याचे सांगितले. कार्यकर्त्यांनी समाजाशी सातत्याने संवाद ठेवत संघटन विस्तार, जनसंपर्क आणि समाजसेवेच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन करावा, असे आवाहन त्यांनी केले. तसेच कार्यकर्त्यांच्या समस्या समजून घेत त्यांच्या नेतृत्व विकासावर भर देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यानंतर शिवरायजी कुलकर्णी यांनी वैचारिक अधिष्ठान या विषयावर मार्गदर्शन करत भारतीय जनता पक्षाच्या विचारसरणीचा मूलभूत पाया उलगडून सांगितला. राष्ट्रहित, सामाजिक समरसता, अंत्योदय आणि राष्ट्रसेवा हीच भारतीय जनता पक्षाची विचारधारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्ते वैचारिकदृष्ट्या सक्षम असतील तर संघटन अधिक सक्षम होईल, असे त्यांनी सांगितले.या प्रशिक्षण वर्गात आगामी सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक आव्हानांवर सखोल चर्चा करण्यात आली. कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करून संघटनाला अधिक गतिमान आणि प्रभावी बनविण्यासाठी विविध विषयांवर मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी देशासमोरील सामाजिक व आंतरिक आव्हाने, प्रा.अनिल सोले यांनी आपला इतिहास विकास तर श्रीकांत देशपांडे यांनी विचार परिवार या विषयांवर मार्गदर्शन केले.

तिसऱ्या सत्रात सुमित मिश्रा यांनी सोशल मीडिया, नमो ॲप व सरल ॲप याबाबत माहिती दिली, तर आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यावहारिक सत्राद्वारे कार्यकर्त्यांना प्रत्यक्ष कामकाज आणि संघटनात्मक बाबींवर मार्गदर्शन केले.या सत्रांना अध्यक्ष म्हणून प्रकाश देवतळे, सविता दंढारे आणि नामदेव डाहुले यांची उपस्थिती लाभली. प्रशिक्षण वर्गामुळे कार्यकर्त्यांना नवऊर्जा, नवी दिशा आणि अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा मिळणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# थोडक्यात

## मोजणी प्रकरणांचा तातडीने निपटारा करा - आ.दाते



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** भूमीअभिलेखमध्ये असणाऱ्या मोजणी प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा. शेतकऱ्यांच्या जमिनी एकत्रिकरण मोजणी प्रकरणे हदनिश्चित आदी प्रकरणे अनेक वर्ष प्रलंबित आहेत. त्यासाठी शेतकऱ्याची अडवणूक करू नका. त्यांना मोजणीसाठी तारखा न देता अधिकारी मोजणीसाठी तातडीने पाठवा, अशा सूचना आमदार काशिनाथ दाते यांनी केल्या आहेत.

तालुक्यातील जनतेच्या प्रश्नाचे निराकरण करण्यासाठी आमदार दाते यांनी भूमी अभिलेख अधिकारी कार्यालयात बैठक आयोजित केली होती. यामध्ये तालुक्यातील २२३३ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यातील ७१३ प्रकरणांना तारीख दिली, १३२० शिल्लक मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत. कार्यालयात नियमित कर्मचाऱ्यांची संख्या ८ असून, खासगी व इतर एजन्सीकडून नियुक्त असे एकूण ३० कर्मचारी आहेत. त्यांच्या माध्यमातून तातडीने प्रलंबित असणारे प्रकरणे मार्गी लावण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत.

बैठकीत शेतकऱ्यांनी समस्या मांडल्या. शेतकऱ्यांना मोजणीच्या तारखा अद्याप मिळाल्या नाहीत. त्यांना तारखा देऊ, त्यांच्या हद्दी दाखवाव्यात, नव्याने ३० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल. एकत्रीकरणाची प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात येईल. कमी कर्मचारी संख्येमुळे मोजणी प्रकरणे प्रलंबित राहत असल्याचे उपअधीक्षक जितेंद्र भिंगारदिवे यांनी सांगितले. यावेळी शिररस्तेदार विजय हरिश्चंद्रे, परीक्षण भूमापक प्रशांत शिंदे, कनिष्ठ लिपीक दुर्गेश सोनार आदी उपस्थित होते.

भूमिअभिलेखमध्ये प्रलंबित मोजणी प्रकरणासाठी अधिकाऱ्यांना तातडीने ते प्रकरणी निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानंतरही काही शेतकऱ्यांच्या मोजण्या राहिल्या असल्यास त्यांनी कार्यालयाशी संपर्क साधावा याप्रकरणी तातडीने कारवाई करण्यात येईल. असे आमदार काशिनाथ दाते यांनी सांगितले.

# तुम्हाला नाही तर आम्हालाही गरज नाही; रवि रासकर यांचा इशारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२५, पारनेर (अहिल्यानगर) :** आघाडी असताना जर काँग्रेसला विचारात घेत नसाल, तर आम्हाला पण तुमची गरज नाही, असे ठणकावत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवण्याची घोषणा पारनेर तालुका कामगार सेनेचे तालुकाध्यक्ष रविश रासकर यांनी केली आहे.

कान्हुर पठार येथे आयोजित संयुक्त जयंती सोहळ्यात खासदार नीलेश लंके यांनी पुणेवाडीचे मारुती रेपाळे यांची जवळा जिल्हा परिषद गटासाठी उमेदवारी जाहीर केली. शिवसेना उबाठा, राष्ट्रवादी शरद पवार गट व काँग्रेसची आघाडी असताना घटक पक्षांना विश्वासात न घेता उमेदवारी जाहीर केल्याने जवळा गटात चर्चेला उधाण आले आहे.

सुपा गटामध्ये रवि रासकर यांच्या पत्नी चैतालीताई रासकर या उमेदवार आहेत.लोकसभा व विधानसभा निवडणुकीत एकत्र लढलेल्या मविआमध्ये पारनेर तालुक्यात आता बिघाडीची चिन्हे दिसू लागली आहेत. काँग्रेसने स्वबळाचा नारा दिल्याने सुपा जिल्हा परिषद गटासह तालुक्यातील इतर जागांवरल समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

### सरकारी योजनांवरून सरकारला घेरले

काँग्रेस तालुका महिला अध्यक्षा मनिषा ठुबे यांनी भाजप सरकारच्या योजनांच्या अंमलबजावणीवरही जोरदार टीका केली. निवडणुकीपूव मते मिळवण्यासाठी लाडकी बहीण योजना आणली. तेव्हा सरसकट अनुदान दिले, आता मात्र एका कुटुंबात फक्त दोन महिलांनाच लाभ मिळतो. त्यामुळे घराघरात भांडणे लागली आहेत, असा आरोप त्यांनी केला. पीएम किसान योजनेत सुरुवातीला सर्व सामाईक खातेदारांना अनुदान दिले, आता फक्त एकालाच देत असल्याचे सांगत त्यांनी प्रश्न केला, सुरुवातीलाच असे निकष का लावले नाहीत? श्रावणबाळ व संजय गांधी योजना ३१ ऑक्टोबर २०११ रोजी काँग्रेस सरकारने सुरू केल्या, मात्र भाजप सरकारने निकष न पाळता बोगस अनुदान वाटल्याचा ठपकाही त्यांनी ठेवला. बांधकाम कामगारांना भांड्याचे वाटप फक्त प्रवरा नगर व अहिल्यानगर येथेच का केले जाते,असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

---

### पंजा दिसेल तिथे मतदान होणार

नेते मंडळींच्या मनात काही असले तरी कष्टकरी जनतेच्या मनात काँग्रेसच आहे,असे काँग्रेसचे कार्यकर्ते इंजि.सुभाष ठुबे म्हणाले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत काँग्रेसला विचारात घेतले नसले तरी विधानसभा निवडणुकीत राणीताई लंके यांना भरघोस मतदान केल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, खासदार निलेश लंके यांच्या काही हितचिंतकांनी कान्हुरपठार येथे मतदानापूर्वीच विरोधी उमेदवारांच्या पताका काढल्या. कार्यकर्त्यांना भान न राहिल्याने राणी लंके पराभूत झाल्या,यात आमचा काय दोष? असा सवाल त्यांनी केला.

## पाणीटंचाईमुळे बोरीकर त्रस्त; जलजीवन योजनेकडे नागरिकांच्या आशा



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२५, बोरी (परभणी) :** बोरी येथे दरवर्षी उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत असून नागरिकांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. पाणी भरण्यासाठी नागरिकांनी गल्लीत बादल्या, कॅन व पाण्याची भांडी रांगेत लावल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. नागरिकांना पाण्यासाठी तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.बोरी शहराला दुष्काळाच्या काळात बांधण्यात आलेल्या दुष्काळ विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो. या विहिरीचे पाणी संपूर्ण बोरी शहराला पुरविण्यात येते. मात्र, दरवर्षीप्रमाणे मे आणि जून महिन्यादरम्यान या विहिरीतील पाणीसाठा कमी होत असल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण होत आहे.

पाणीसाठा कमी असल्यामुळे बोरी येथे नळाद्वारे तब्बल १० दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. तसेच, वॉर्ड क्रमांक ५ मध्ये काही नागरिक मोठमोठ्या मोटारी लावून पाणी घेत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे इतर नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी मिळत नसल्याची तक्रार समोर येत आहे.या प्रकाराकडे ग्रामपंचायतीने लक्ष देण्याची गरज नागरिकांकडून व्यक्त होत आहे.दरम्यान, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अजय भैय्या चौधरी यांनी पाठपुरावा करून बोरीसाठी जलजीवन योजना मंजूर करून आणली. ही योजना प्रत्यक्षात कधी सुरू होईल या आशेने नागरिक प्रतीक्षा करत आहेत.

# शेतजमिनीच्या वादातून महिलेच्या अंगावर घातला ट्रॅक्टर; ८ जणांवर गुन्हा दाखल

## जमिनीच्या वादातून टोकाचे पाऊल; महिलेसह तिघे जखमी, एकाची प्रकृती गंभीर

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२५, विंचूर (नाशिक) :** शेतजमिनीच्या जुन्या वादातून चालू असलेल्या वादाचे रूपांतर भीषण घटनेत झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. पिंपळगाव बसवंत येथील एका वादग्रस्त शेतात बेकायदेशीरपणे नांगरणी करत असताना, ती थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका महिलेच्या अंगावर थेट ट्रॅक्टर घातल्याचा खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. या भीषण घटनेत महिला गंभीर जखमी झाली असून, तिच्यासह अन्य दोघे जण किरकोळ जखमी झाले आहेत.

याप्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर चालकासह एकूण ८ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




### न्यायालयाने वाद सुरू असलेल्या शेतात नांगरणी

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अजय विष्णुगिरी गोसावी (वय ५१, रा.गोसावी वाडा, पिंपळगाव बसवंत) यांची गट नं. ४८७/१ व ४८७/२ या शेतजमिनीबाबत न्यायालयात कायदेशीर वाद सुरू आहे. शुक्रवारी (दि. २३) दुपारी सव्वादोनच्या सुमारास या वादग्रस्त शेतात काही लोक भाडेतत्त्वावर ट्रॅक्टर आणून नांगरणी करत असल्याची माहिती गोसावी यांना मिळाली. माहिती मिळताच अजय गोसावी व त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने शेताकडे धाव घेतली.

### ट्रॅक्टर थांबवण्यास सांगताच अंगावर घातला

शेतात पोहोचल्यानंतर गोसावी यांनी ट्रॅक्टर चालक अजय चंद्रकांत उन्हाळे (रा. नारायण टेंभी, ता. निफाड) याला नांगरणी थांबवून पोलीस ठाण्यात चालण्यास सांगितले. मात्र, चालकाने त्यांचे न ऐकता ट्रॅक्टर पुढे दामटला. फिर्यादीच्या पत्नी रश्मी गोसावी यांनी ट्रॅक्टर रोखण्याचा प्रयत्न केला असता, चालकाने थेट ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर घातल्याचा आरोप फिर्यादीत केला आहे. या दुर्घटनेत रश्मी गोसावी यांच्या चेहऱ्यावरून ट्रॅक्टरचे मागील चाक गेल्याने, तसेच डोके, पाय आणि बरगडीला गंभीर दुखापत झाली आहे.

### बचावासाठी गेलेले नातेवाईक ही जखमी

रश्मी गोसावी यांना वाचवण्यासाठी धावून गेलेल्या सुवर्णा सुभाष गोसावी यांनाही ट्रॅक्टरचा जोरदार धक्का लागल्याने त्यांच्या हात व पायाला दुखापत झाली. तसेच, फिर्यादी अजय गोसावी हेदेखील ट्रॅक्टरच्या नांगराच्या फाळाचा धक्का लागल्याने जखमी झाले आहेत.

### ट्रॅक्टर थांबवू नको, चालू ठेव...

घटनेच्या वेळी उपस्थित असलेल्या संशयित आरोपींपैकी ऋषिकेश निखील गोसावी याने ट्रॅक्टर चालकाला ट्रॅक्टर थांबवू नको, चालू ठेव अशी प्रक्षोभक चिथावणी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तसेच इतर आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

### डायल ११२ मुळे तात्काळ मदत; ८ जणांवर गुन्हे

घटनेनंतर तात्काळ 'डायल ११२' वर संपर्क साधून पोलिसांना पाचारण करण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या रश्मी गोसावी यांना पिंपळगाव बसवंत येथील राधाकृष्ण हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी पिंपळगाव बसवंत पोलिसांनी अजय चंद्रकांत उन्हाळे, ऋषिकेश निखील गोसावी, अभिषेक निनाद गोसावी, रेणु निनाद गोसावी, निनाद प्रताप गोसावी, सृष्टी निखील गोसावी, स्मिता नितीन गोसावी व नितीन गोसावी अशा ८ जणांविरुद्ध गुन्हा रजि. क्र. १३५/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १८९(२), १९१(२), १९०, ११८(२), ११८(१), ११५, ३५२, ३५१(२) आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१)(३)/१३५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बापू आहेर करत आहेत.

## द हिरोज ऑफ अहिल्यानगर २०२६ पुरस्काराने पोलीस निरीक्षक संजय ठेंगे सन्मानित



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२४, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेत दैनिक पुण्यनगरी, अहिल्यानगर जिल्हा यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा द हिरोज ऑफ अहिल्यानगर - २०२६ हा पुरस्कार दिनांक २४ मे २०२६ रोजी शिर्डी येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात आला. राहुरी पोलिसांनी ऑपरेशन मुस्कान अभियानांतर्गत उल्लेखनीय कामगिरी करत तब्बल १०९ हरवलेल्या मुलींचा शोध घेऊन त्यांना सुरक्षितपणे पालकांच्या ताब्यात दिले आहे. या संवेदनशील आणि मानवतावादी कार्याची दखल घेत दैनिक पुण्यनगरी वृत्तसमूहाकडून हा सन्मान प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश तसेच पद्मश्री पुरस्काराने सन्मानित राहिबाई पेरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी हा पुरस्कार स्वतःच्या कार्यापुरता मर्यादित न ठेवता, वरिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शन, राहुरी पोलीस स्टेशनमधील अधिकारी व अंमलदार यांचे टीमवर्क तसेच समाजातील विविध घटकांच्या सहकार्याला समर्पित केला आहे. विशेषतः राकेश ओला, सोमनाथ घार्गे, मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, सोमनाथ वाघचौरे, डॉ. बसवराज शिवपुजे साहेब व जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाचा त्यांनी विशेष उल्लेख केला.

तसेच राहुरी तालुका कलाकार मंच, स्नेहालय संस्था, केअर संस्था यांनी जनजागृतीसाठी घेतलेला पुढाकार, राहुरी तालुक्यातील शालेय शिक्षक, शिक्षण विभाग आणि पोलीस पाटील यांच्या सहकार्यामुळेच ऑपरेशन मुस्कान अभियान यशस्वी झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. सामाजिक बांधिलकी जपत संवेदनशील पोलीसिंगचा आदर्श निर्माण करणाऱ्या राहुरी पोलिसांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, या पुरस्कारामुळे राहुरी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.